(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधींच्या सत्य आणि अहिंसा तत्वज्ञानाचा अन्वयार्थ

**डॉ. शशिकांत श्रीधर अन्नदाते** महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

---

**प्रास्ताविक :**

'अहिंसेचे तत्त्वज्ञान' ही महात्मा गांधींची सर्वांत मोठी देणगी होय. त्यांनी म्हटले आहे कि,"हिंसा ही, पशूच्या जीवनाचा कायदा आहे तर अहिंसा हा मानवी जीवनाचा नियमआहे. पशु हा शारीरिक शक्तीच्या आधारावर जगत असतो तर मानव अधिक उच्च अशातत्त्वावर जगतो. अहिंसा ही एक पूर्ण अवस्था आहे आणि मानव निसर्गत: कळत नकळत या अवस्थेत जात आहे.

महात्मागांधींनी 'अहिंसा' हे केवळ तत्त्वज्ञानातील तत्त्व म्हणून मानले नाही. ते म्हणत, "अहिंसा हा माझ्या जीवनाचा नियम आणि निःश्वास आहे... अहिंसा ही माझ्या बुद्धीशी संबंधित नाही, माझ्या हृदयाशी संबंधित आहे."अहिंसा हे महात्मा गांधीच्या जीवनाचे सार सर्वस्व होते. त्यांनी अहिंसेचे चिंतन गौतम बुद्ध, भगवानमहावीर, येशूख्रिस्त यांनी पुरस्कारिलेल्या तत्वाचा मोठा प्रमाणावर राष्ट्रीय राजकारणात वापर करून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.

**अहिंसेचा अर्थ**

अभावात्मक दृष्टीने पाहता अहिंसा या शब्दाचा अर्थ दुसऱ्या व्यक्तीस दुःख न देणे, इजा न करणे अथवा कोणाचा जीव न घेणे असा होतो. सन १९३५ मध्ये महात्मा गांधींनी आपल्या 'हरिजन' या नियतकालिकात 'अहिंसा म्हणजे जगातील कोणासही आपल्या विचारांनी शब्दांनी आणि कृतींनी न दुखविणे' अशी व्याख्या केली आहे. अहिंसेत कटु शब्द, राग, द्वेष, मत्सर, कठोर निर्णय, क्रोध आणि दुष्टता टाळण्याची अपेक्षा असते.अहिंसेला भावात्मक अर्थही आहे. ख्रिश्चन धर्मातील प्रेम हे तत्त्व म्हणजे अहिंसेचाभावात्मक अर्थ आहे.

**अहिंसा एक प्रचंड शक्ती**

अहिंसा म्हणजे दौर्बल्याचा आविष्कार, हा अर्थ गांधींना मंजूर नाही. अहिंसा ही एक प्रचंड शक्ती आहे. हे स्पष्ट करताना गांधी म्हणतात-

"दुष्टाच्या इच्छेला बळी पडणे म्हणजे अहिंसा नव्हे. अहिंसा ही आत्म्याची शक्ती आहे. सत्याची शक्ती आहे, सत्यशोधनाची शक्ती आहे. अहिंसा म्हणजे सत्याग्रह. आपल्याजवळील सर्व नैतिक आणि आध्यात्मिक शक्तीच्या साहाय्याने दुष्टतेचा प्रतिकार करणे म्हणजे सत्याग्रह होय. सत्याच्या समर्थनासाठी नैतिक शक्तीचा अथवा दृढतेचा वापर करणे म्हणजे सत्याग्रह होय.

गांधींच्या मते अहिंसा ही नकारात्मक शक्ती नाही; विजेपेक्षा, ईश्वरापेक्षाही प्रभावी अशी ही भावात्मक शक्ती आहे सर्वांत तीव्र हिंसेला सर्वोच्च अहिंसेने तोंड देता येईल.

महात्मागांधीम्हणत कि,अहिंसेच्या तत्त्वासाठी मी जगतो, अहिंसेसाठी माझी मरण्याचीही तयारी आहे. गांधींनी आत्मत्यागाने हे सिद्धही केले.

**सत्य हा अहिंसेचा मुलभूत घटक**

'सत्य' हा अहिंसेचा मूलभूत घटक आहे. अहिंसा ही सत्यावर आधारलेली असते त्यामुळे अहिंसेची सत्यापासून फारकत करता येत नाही. गांधींची ईश्वरावर अपार श्रद्धा म्हणूनत्यांनी सत्य आणि ईश्वर यांचा संबंध जोडला आहे. ते म्हणतात, "केवळ ईश्वर सत्य आहेम्हणून भागणार नाही. सत्य हाच ईश्वर आहे."

अहिंसा म्हणजे सत्यासाठी संघर्ष आहे. हा संघर्ष योग्य मार्गाने चाललेला असेल तर संघर्षाचे दोन्ही पक्ष सत्याचाच शोध घेतात. त्यामुळे शेवटी जित आणि जेते असा भेद राहत नाही. अहिंसात्मक संघर्ष चालू असताना आपण ज्या कार्यासाठी झगडत आहोत ते सत्य आहे. अशी प्रत्येकाची खात्री असली पाहिजे. प्रत्येकाला ईश्वराने सत्य जाणून घेण्याची शक्ती दिलेली असते. संघर्ष चालू असता आपण सत्यापासून विचलित झालो आहोत याची जाणीव झाली तर कोणताही संदेह मनात न ठेवता माणसाने आपला गुन्हा कबूल केला पाहिजे. इतकेच नव्हे तर सत्यासाठी आपल्याला मिळालेल्या फायद्यांचा त्याग करण्याचीही तयारी ठेवली पाहिजे. सत्याग्रहीला विजयापेक्षा

सत्य अधिक प्रिय आणि मोलाचे असते. या धारणेतूनच गांधींनी १९२२ साली आपल्या असहकार चळवळीत चौरीचौरा येथे जाळपोळझाली, जमाव हिंसक होऊ लागला, तेव्हा त्यांनी त्यांनीअसहकारचळवळ मागे घेतली.

**नीतीतत्वांचा पुरस्कार**

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महात्मा गांधींनी या नीतितत्त्वांचा पुनरुच्चार प्रथम दक्षिण आफ्रिकेत आणि मग भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनात केला. त्यानंतर त्यांचे कार्यक्षेत्र वैयक्तिक जीवनापुरतेच मर्यादित राहिले नाही. गांधीजींनी देशातील राजकीय व सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी ही तत्त्वे किती प्रभावीपणे उपयोगी पडतात, ते अनेक चळवळींद्वारे दाखवून दिले व सर्वसामान्य लोकांच्या ठिकाणी आत्मविश्वास व प्रतिकारक्षमता निर्माण केली. त्यांच्या विचारांचा लोकांवर त्या काळी विलक्षण पगडा बसला आणि लोक त्यांच्या पाठीशी उभे राहिले. त्यापूर्वी अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी हिंसात्मक मार्गाचा वापर केला जात असे. परंतु महात्माजींनी पदोपदी साधनशुचितेचा आग्रह धरून आपल्या चळवळींना नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

**अहिंसेची प्रचिती लोकांना आंदोलनातून समजावली**

सत्य, अहिंसा ही तत्त्वे परमार्थापुरती ठीक आहेत. परंतु त्यांचा प्रत्यक्ष व्यवहारात फारसा उपयोग नाही. राजकारणात जशास तसे हाच न्याय लागू केल्याशिवाय गत्यंतर नाही अशी सर्वसामान्य लोकांचीच नव्हे तर मोठमोठ्या पुढाऱ्यांचीही समजूत होती. महात्माजींनी 'मोठमोठी अहिंसात्मक आंदोलने यशस्वी करून लोकांचा हा गैरसमज दूर केला व अहिंसा सामूहिक प्रतिकाराचे एक प्रभावी शस्त्र आहे याची लोकांना प्रचीती आणून दिली.

महात्मा गांधी म्हणतात "सर्व सुसंघटित समाजाचा पाया अहिंसाधर्म हा आहे. आजूबाजूला विनाशाचे साम्राज्य पसरलेले असताना त्यामध्ये जीवन टिकाव धरून आहे; यावरून विनाशाहून श्रेष्ठ असे जीवनाचे एखादे शाश्वत नियामक तत्त्व असले पाहिजे आणि ते आहेच, अशी माझी धारणा आहे. असे एखादे सर्वश्रेष्ठ तत्त्व असेल तरच सुसंघटित समाजाची उपपत्ती लागू शकते आणि जीवन जगण्यालायक बनते. अर्थात, हे तत्त्व आपल्याला रोजच्या जीवनात प्रयत्नपूर्वक अमलात आणावे लागेल. जेथे जेथे विसंवाद दृष्टीस पडेल, जेथे जेथे विरोध उत्पन्न होईल तेथे तेथे त्याला प्रेमाने जिंकले पाहिजे."

**सद्सदविवेक बुद्धीला पटते ते सत्य**

सत्य म्हणजे माणसाच्या अंतःकरणाला जे जाणवते व सदसद्विवेक बुद्धीला जे पटतेतेच त्याचे सत्य. त्या सत्याची आराधना करता करता त्याला निरपेक्ष, शुद्ध व अंतिम सत्याचेदर्शन घडते.

माणसाला एखाद्या विशिष्ट काळी जे सत्य वाटते तेच त्याच्या अनुभवात भर पडल्यावर किंवा भोवतालच्या परिस्थितीत बदल झाल्यानंतर त्याला वाटेलच असे नाही. त्यामुळे त्याची पूर्वीची वागणूक व आताचे आचरण यात बाह्यतः विसंगती वाटली तरी त्याने जर स्वतःशी इमान राखले असेल तर त्याच्या वर्तनात एकप्रकारची अंतःसंगती दिसून आल्याखेरीज राहणार नाही.

**सत्य आणि अहिंसा एकरूपच**

सत्याचा शोध अहिंसेशिवाय अशक्य आहे. सत्यात सर्व काही येऊन जाते. सत्याचे दर्शन आपल्याला पूर्णतया होणे शक्य नाही. मनुष्य कितीही मोठा झाला तरी त्याला प्रतीत होणारे सत्य नेहमीच सापेक्ष व अंशात्मक असणार. आपला अंतरात्मा जे सांगतो ते सत्य. मनुष्याचे मन हे वेगवेगळ्या माध्यमांच्या द्वारे काम करीत असते आणि मनाच्या विकासाची क्रिया सर्वांच्या बाबतीत सारखीच नसते; म्हणून एकाचे सत्य दुसऱ्याचे असत्य असू शकेल. ही वेगवेगळी सत्ये झाडाच्या वेगवेगळ्या पानासारखी आहेत, हे लक्षात घेतले म्हणजे एकाला जे सत्य वाटते ते दुसऱ्याला तसेच वाटले पाहिजे असे म्हणणे बरोबर नाही. म्हणून ज्याला जे सत्य वाटते त्याप्रमाणे त्याने सत्य वागावे, नव्हे ते त्याचे कर्तव्यही आहे.जोपर्यंत मनुष्य स्वतःला शेवटचे स्थान देणार नाही तोपर्यंत मनुष्याला सत्याचे खरे दर्शन होणारच नाही. अहिंसा ही नम्रतेची पराकाष्ठा आहे; म्हणून, अहिंसेशिवाय मनुष्याला तरणोपाय नाही.

**सत्य व अहिंसा वस्तुत: एकरूपच**

सत्य आणि अहिंसा ही वस्तुतः एकरूप आहेत. त्यांचा संबंध साध्य साधनांप्रमाणे आहे. म्हणजे अहिंसा हे साधन व सत्य हे साध्य आहे. साधने ही नेहमीच साध्यात परिणत होतात. म्हणून साधनाची चिंता वाहता वाहता

साध्य हस्तगत होऊ शकते. साधनाच्या शुद्धतेशिवाय साध्य अशक्य आहे अशी आपली खात्री झाली की आपण अशा एका उच्च पातळीवर स्थिरावतो आणि मग बाह्यतः आपला कितीही पराभव होतो आहे असे वाटले तरी सत्य हे एकच आहे आणि ते हेच असा विश्वास यत्किंचितही ढळत नाही.त्रिकालाबाधित तत्त्व एकच आहे व ते म्हणजे सत्य, अशी महात्माजींची श्रद्धा होती. सत्य हे सर्वश्रेष्ठ. कारण असत्य हिंसा आहे. ज्याला सत्य प्रिय आहे तो केव्हा ना केव्हा अहिंसेप्रत पोहोचणारच.

**समारोप**

अशा प्रकारे गांधी मानवी जीवनाला आधारभूत झालेल्या सत्य, अहिंसा व निर्वैर वृत्ती इत्यादी तत्त्वांवरील आपली श्रद्धा व्यक्त करतात. परंतु आपली श्रद्धा ही अंधश्रद्धा नाही, हे सांगताना ते म्हणतात, "अहिंसा शूराची व सबळाची असली पाहिजे. मानवाच्या ठिकाणी असलेल्या मूल्यांवरील निष्ठेतून ती प्रकट झाली पाहिजे. आपल्या अंतःकरणात हिंसा असेल तर अहिंसेचा बुरखा पांघरण्यापेक्षा सशस्त्र प्रतिकार करणे अधिक योग्य होय. एक वेळ हिसक मनुष्य अहिंसावादी होण्याची शक्यता असते पण भ्याड व पलायनवादी मनुष्याच्या बाबतीत तशी आशा नाही."

महात्मा गांधींच्या मते विश्वाची मूलभूत सत्ये फारच थोडी आहेत. इतर सर्व सत्ये देशकाल परिस्थिती लक्षात घेऊन केलेल्या त्या मूलभूत सत्याचे प्रयोग होत सत्य स्थळकाळानुरूप बदलतात.

**संदर्भ ग्रंथ**

१. कुंडलेम.बा.(१९९६), शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे

२. अकोलकर ग.वि (१९७३), शैक्षणिक तत्वज्ञानाची रूपरेषा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे

३. दुनाखे अरविंद (२००७), प्रगत शैक्षणिक तत्वज्ञान, नित्य नूतन प्रकाशन, पुणे

४. बाचल वि.मा. (२००९), भारतीय राजकीय विचारवंत, के'सागर पब्लिकेशन्स, पुणे